**<u>ठळक बातम्या</u>**

- सध्याच्या सात ते आठ टक्के वृद्धीदरापेक्षा जास्त वाढीची क्षमता भारतीय अर्थव्यवस्थेत आहे असं जागतिक बँकेच्या अध्यक्षांचं प्रतिपादन

- एनएचएआयच्या टोल वसुलीत झालेल्या कथित फसवणुकीच्या प्रकरणात ईडीचे देशभरात १४ ठिकाणी छापे

- दिशा सालियन मृत्यू प्रकरणाची चौकशी सीबीआयकडे सोपवण्याचे मुंबई उच्च न्यायालयाचे आदेश

**आणि**

- चीन मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या किदंबी श्रीकांतचा दुसऱ्या फेरीत प्रवेश, लक्ष्य सेन मात्र स्पर्धेतून बाहेर

**<><><><><>**

सध्याच्या सात ते आठ टक्के आर्थिक वृद्धीदरापेक्षा जास्त वाढीची क्षमता भारतीय अर्थव्यवस्थेत आहे, असं प्रतिपादन जागतिक बँकेचे अध्यक्ष अजय बंगा यांनी केलं आहे. अमेरिकन अॅशाविले इथं जी-२० देशांच्या अर्थमंत्री आणि मध्यवर्ती बँकांच्या गव्हर्नर्सच्या परिषदेच्यावेळी ते बोलत होते. जागतिक स्तरावरचे उर्जा संकट, अनिश्चित व्यापार तसंच एल निनोचा परिणाम अशा अनेक गोष्टींमुळे भारताच्या आर्थिक कामगिरीवर परिणाम झाल्यांचं त्यांनी नमूद केलं. आताची वाढ ही भारताच्या क्षमतेची चुणूक आहे असंही त्यांनी सांगितलं.

या परिषदेत सहभागी झालेल्या केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी अजय बंगा यांची भेट घेतली. भारतात बहुस्तरीय गुंतवणूक हमी आणि इतर महत्त्वाच्या मुद्यांवर यावेळी चर्चा झाली.

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी काल युरोपीयन युनियनच्या अर्थव्यवस्था विभागाचे आयुक्त वाल्दिस डॉम्ब्रोवस्किस यांची देखील भेट घेतली. यावेळी भेटीत भारत आणि युरोपियन युनियनमधल्या आर्थिक तसंच वाणिज्य भागीदारीवर चर्चा झाली.भारत आणि युरोपियन युनियनमधला मुक्त व्यापार करार, लवचिक आणि वैविध्यपूर्ण पुरवठा

साखळीचं बळकटीकरण, कच्चा माल आणि तंत्रज्ञान याबाबतीतले सहकार्य, फिनटेक, कृत्रिम बुद्धीमत्ता तसंच जनरेटीव एआय अशा अनेक क्षेत्रांमधल्या वाढती संधी आणि सहकार्य याबाबतही अशा अनेक बाबींवर चर्चा झाली.

<><><><><>

JCRA या जपानच्या पतमानांकन संस्थेनं भारताचं सार्वभौम मानांकन BBB+ वरून सुधारुन A- श्रेणीत आणलं आहे. भारताची भक्कम आर्थिक वाढ, मजबूत खाजगी खरेदी आणि सार्वजनिक गुंतवणूक, तसंच वित्तीय प्रणालीच्या सुदृढतेत झालेल्या सुधारणांच्या पार्शवभूमीवर हे मानांकन सुधारलं असल्याचं JCRA च्या अधिकृत निवेदनात म्हटलं आहे. भारतीय अर्थव्यवस्थेनं ७ टक्क्यापेक्षा जास्त उच्च वाढीचा दर कायम राखला आहे, सरकारनं उत्पादकता वाढ आणि आर्थिक विकासाकरता अनुकूल धोरणांची सातत्यानं अंमलबजावणी केली आहे, याची नोंद या निवेदनात घेतली आहे.

JCRA नं बँकिंग क्षेत्रातल्या सुधारणेकडेही लक्ष वेधलं आहे. यंदा मार्च महिनाअखेर एकूण थकित कर्जाचं प्रमाण १ पूर्णांक ८ दशांश टक्क्यांपर्यंत घसरल्याचं नमूद केलं आहे. या संस्थेनं या सुधारणेचं श्रेय दिवाळखोरी आणि नादारी कायदा, सरकारी भांडवली गुंतवणूक, आणि रिझर्व्ह बँकेच्या अधिक मजबूत देखरेखीला दिलं आहे.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज जलशक्ती मंत्रालयाच्या दोन दिवसीय विभागीय परिषदेच्या समारोप सत्राला संबोधित करणार आहेत. टीम इंडिया ही भावना बळकट करण्यासाठी आणि सहकारी संघराज्यवादाच्या दृढीकरणासाठी विभागीय परिषदेच्या मालिकांची संकल्पना प्रधानमंत्र्यांनी मांडली होती. त्या अनुषंगाने ही पहिलीच विभागीय परिषद आहे. केंद्र आणि राज्य सरकार यांना एकाच व्यासपीठावर आणून या क्षेत्रातल्या प्राधान्यक्रमावर चर्चा करण्यासाठी आणि कालमर्यादित कृती आराखडे तयार करण्यास या परिषदांची मदत होणार आहे. पाणीविषयक पायाभूत सुविधा प्रकल्पांची वेळेवर अंमलबजावणी, जल संचय जन भागीदारी, पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांची शाश्वतता आणि जल जीवन मिशन ची दुसरी आवृत्ती या चार प्रमुख क्षेत्रांवर या परिषदेत विशेष लक्ष दिलं होतं.

<><><><><>

केंद्र सरकारच्या सॉफ्ट लोन योजनेच्या धर्तीवर राज्यातल्या सहकारी साखर कारखान्यांना पतपुरवठा करण्यासाठीचा प्रस्ताव तात्काळ मंत्रिमंडळासमोर सादर करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी दिले आहेत. राज्यातल्या सहकारी साखर कारखान्यांसाठी पतपुरवठा आणि कारखान्यातली संलग्न उत्पादनं याबाबत धोरण ठरवण्यासाठी आज मुंबईत झालेल्या बैठकीत त्या बोलत होत्या. आगामी गाळप हंगामात पूर्वतयारीसाठी  आणि ऊसउत्पादकांना एफआरपीची रक्कम वेळेवर देता यावी याकरता सॉफ्ट लोनची मदत होईल. साखर कारखान्यांमधे साखरेबरोबर तयार होणाऱ्या पदार्थांसाठी सर्वसमावेशक धोरण ठरवण्याची सूचना सुनेत्रा पवार यांनी बैठकीत केली.

<><><><><>

भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण एनएचएआयच्या टोल वसुलीत झालेल्या कथित फसवणुकीच्या प्रकरणात सक्तवसुली संचालनालयाने देशभरात १४ ठिकाणी छापे टाकले आहेत. महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, राजस्थान, जम्मू, मध्य प्रदेश, नवी दिल्ली आणि कोलकाता यांचा या मोहिमेत समावेश आहे. मनी लाँडरिंग प्रतिबंधक कायद्यांतर्गत हे छापे टाकण्यात आले आहेत. अधिकृत टोल पावत्या तयार करण्यासाठी आणि टोल वसुलीच्या अधिकृत हिशोबात अफरातफर करण्यासाठी सॉफ्टवेअर ॲपचा वापर झाल्याचा आरोप ईडीने केला आहे.

दरम्यान, परिमॅच या संकेतस्थळावर झालेल्या अवैध सट्टेबाजीप्रकरणी ईडीने विविध राज्यांमध्ये १२ ठिकाणी छापे टाकले आहेत. महाराष्ट्रात पाच ठिकाणी, दिल्ली एनसीआरमध्ये चार तर राजस्थानमध्ये दोन आणि गुजरातमध्ये एका ठिकाणी हे छापे टाकण्यात आले. सट्टेबाजीतून मिळालेल्या पैशांचं रोख रकमेत रुपांतर करून ही रक्कम देशाबाहेर पाठवायला मदत केल्या प्रकरणी ही कारवाई करण्यात आली आहे.

<><><><><>

दिवंगत अभिनेता सुशांत सिंह राजपूत याची मॅनेजर दिशा सालियन हिच्या मृत्यू प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश आज मुंबई उच्च न्यायालयाने सीबीआय अर्थात केंद्रीय अन्वेषण विभागाला दिले आहेत. मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती सारंग कोतवाल आणि न्यायमूर्ती रणजितसिंह राजे भोसले यांच्या खंडपीठासमोर आज या प्रकरणाची सुनावणी झाली. त्यावेळी दिशा हिचे वडील सतीश सालियन यांचा जबाब नोंदवण्यासाठी आणि तक्रार दाखल

करण्यासाठी एका वरिष्ठ आणि अनुभवी अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याचे आदेश सीबीआयला देण्यात आले आहेत. मात्र, तपासादरम्यान, सबळ पुराव्यांशिवाय कोणालाही आरोपी मानलं जाणार नाही, असंही न्यायालयाने स्पष्ट केलं. दिशा सालियन हिचा ८ जून २०२० रोजी मुंबई उपनगरातल्या एका निवासी इमारतीच्या १४व्या मजल्यावरून पडून  मृत्यू झाला होता. या प्रकरणी मुंबई पोलिसांनी अपघाती मृत्युची नोंद केल्याचा तसंच आपली दिशाभूल करत आत्महत्येचा निष्कर्ष स्वीकारण्यासाठी दबाव आणल्याचा आरोप सतीश सालियन यांनी केला होता.

<><><><>

औषध निरीक्षक परीक्षेचा पेपर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षपदाचा कारभार स्वीकारण्यापूर्वी झाला होता, असं विवेक भीमनवार यांनी म्हटलं आहे. या पेपरफुटीनंतर त्यांच्या राजीनाम्याची मागणी होत असल्याच्या पार्श्वभूमीवर त्यांनी हे निवेदन प्रसिद्ध केलं आहे. कोणत्याही गंभीर आरोपाचे मूल्यांकन वस्तुस्थिती, अधिकृत नोंदी आणि पुराव्यांच्या आधारेच झाले पाहिजे, असं ते म्हणाले.

<><><><>

नाशिकमध्ये काँग्रेस पक्षाच्या जिल्हाध्यक्षांच्या दहा दिवसीय निवासी शिबिराचा समारोप आज खासदार राहुल गांधी यांच्या उपस्थितीत होणार आहे. या कार्यक्रमासाठी राहुल गांधी यांचं गंगापूर इथं आगमन झालं तेव्हा नाशिक भाजपने राहूल गांधींविरोधात निदर्शनं केली तसंच काही काळ रास्ता रोको करण्याचा प्रयत्न केला**.** नारी शक्तीला विरोध करणाऱ्या राहुल गांधीचा निषेध करणाऱ्या घोषणा या निदर्शनात  देण्यात आल्या.

<><><><>

बीड-परळी राष्ट्रीय महामार्गावरील जरूर फाटा इथं आज सकल मराठा समाजाने रास्ता रोको आंदोलन केलं. मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला समर्थन देण्यासाठी तसंच मराठा समाजाच्या मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी हे आंदोलन करण्यात आले. यावेळी तहसीलदार आणि पोलीस ठाणे प्रमुखांना समाजाच्या मागण्यांचं निवेदन देण्यात आलं.

<><><><>

राज्य  शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत ‘तीस वर्षांचा पल्ला, तपासणी अन् सल्ला’ हे विशेष अभियान बुलडाणा  जिल्ह्यात १ सप्टेंबर ते १० डिसेंबर २०२६ या

कालावधीत १०० दिवस मिशन मोडवर राबविण्यात येत आहे. जिल्ह्यातल्या ३० वर्ष आणि त्यावरच्या प्रत्येक नागरिकानं या अभियानाचा लाभ घेऊन जवळच्या शासकीय आरोग्य केंद्रात मोफत आरोग्य तपासणी करून घ्यावी, असं आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांनी केलं आहे.

**<><><><><>**

गोंदियात ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी आपल्या विविध मागण्यांसाठी धरणं आंदोलन आणि निषेध मोर्चा काढला. जळगाव जिल्ह्यात ग्रामसेवक प्रल्हाद पाटील यांचा ग्रामसभेदरम्यान झालेल्या मारहाणीत मृत्यू झाल्याच्या घटनेचा निषेध करत हे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात जिल्ह्यातले ३०० हून अधिक नियमित आणि कंत्राटी ग्रामपंचायत अधिकारी सहभागी झाले होते.

**<><><><><>**

चीन मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या किदंबी श्रीकांतने दुसऱ्या फेरीत प्रवेश केला आहे. चिनी तैपेईच्या चि यु जेनला त्यांने २१-१६,२१-१५ असं हरवलं. लक्ष्य सेनला कॅनडाच्या व्हिक्टर लाय कडून पराभव पत्करावा लागला.

मिश्र दुहेरीत ध्रुव कपिला आणि तनिषा क्रॅस्टो यांची जोडी थायलंडच्या जोडीला पराभूत करून पुढच्या फेरीत गेली. महिला एकेरी गटात आज तन्वी शर्मा आणि देविका सिंग यांचे सामने होणार आहेत. सात्विक साईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी ही जोडी देखील आज पुरुष दुहेरीत खेळणार आहे.

**//<><><><><>//**